# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कुस्ती खेळासाठीचे योगदान

**डॉ. श्रीनिवास बाळासाहेब पाटील** शारीरिक शिक्षण संचालक, डी. आर. माने महाविद्यालय, कागल.

shrisports6@gmail.com मो. 9422415818

---

**सारांश :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रातील योगदान सर्वांना माहित आहेच. परंतु या क्षेत्रांबरोबरच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान ही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक व्यक्तींनी समाज बनतो, पण प्रत्येक व्यक्ती समाज घडवीत नसतो. समाजाची जडणघडण करणारा एखादाच व्यक्ती निर्माण होत असतो आणि तो समाजाच्या प्रवाहास पद्धतशीरपणे विधायक वळण देण्याचे काम करतो. हे काम छत्रपती शाहू महाराजांनी केले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात क्रीडा संस्कृती अतिशय चांगल्या पद्धतीने रूजली आणि वाढली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी त्यासाठी पोषक असे वातावरण तयार केले. विशेषता कुस्ती खेळ आपल्या युवा रयतेत रुजवण्याचे काम शाहूराजांनी केले. थोडक्यात मल्लविद्येचे दक्षिणेतील लालन-पालन आणि संवर्धन करण्याचे काम शाहू महाराजांनी केले. त्यामुळेच मल्लविद्याचा पोशिंदा अशी शाहू महाराजांची भारतभर ख्याती आहे. प्रस्तुत अभ्यासामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कुस्ती या खेळाच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी दिलेले योगदान यावर प्रकाशझोत टाकण्यात आलेला आहे.

**महत्वाचे शब्द:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज, क्रीडा संस्कृती, कुस्ती.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कुस्ती खेळासाठीचे योगदान**

**प्रस्तावना:**

भारतावर मुस्लिम राजवटींचे आक्रमण झाल्यानंतर मलयुद्धासाठी 'कुस्ती' हा शब्द रूढ झाला. तो इराण मधून आला असावा असा अंदाज आहे. इराण या देशामध्ये पट्टा अगर दोरी या कमरेला बांधायच्या वस्तूला 'कुष्ठ' असे म्हणत. यातूनच कमरेला विळखा घालून जो खेळ खेळला जातो त्या खेळाला कुस्ती असे नाव रूढ झाले असावे. भारतामध्ये पटियाला या शहराला मल्लविद्येची गंगोत्री मानली जाते तर कोल्हापूरला मल्लविद्येचे माहेर घर म्हटले जाते. जसे पटियालाचे महाराज राघवेंद्र सिंग यांना मल्लविद्याचे भोक्ते असे म्हटले जाते त्याच पद्धतीने कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना मल्लविद्याचे पोशिंदे असे संबोधले जाते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळाचा विचार केला तर त्याकाळी ब्रिटीशांनी लोकांना लढवय्ये करण्याऐवजी कारकून करण्याचे काम सुरू केले होते. त्याच काळी 1867 मध्ये पुणे महाविद्यालयात मल्लखांब व कसरतीचे व्यायाम वर्ग सुरू झाले. 1881 मध्ये पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये टेनिस, क्रिकेट इत्यादी खेळाची सुरुवात झाली. याच काळात महाराष्ट्रसह काही मोजक्या शहरात शारीरिक शिक्षण व क्रीडा विकासाला पोषक वातावरण तयार होत होते. पण काही संस्थानिकांनी याचा दूरदृष्टीकोनातून अभ्यास करून हा क्रीडा विकास सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचा नियोजनात्मक प्रयत्न केला. त्यामध्ये कोल्हापूर संस्थानाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी 1894 ते 1922 या काळात कोल्हापूर संस्थानात शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विकासाबाबत सकारात्मक व धोरणात्मक निर्णय घेतल्याने शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रात कोल्हापूर संस्थान अग्रेसर राहिले. कोल्हापूर संस्थानात क्रीडा संस्कृती अतिशय चांगल्या पद्धतीने रूजली आणि वाढली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी त्यासाठी पोषक असे वातावरण तयार केले. विशेषता कुस्ती खेळ आपल्या युवा रयतेत रुजवण्याचे काम शाहूराजांनी केले. सध्या कोल्हापुरातील अनेक युवक-युवतीनी कुस्ती, क्रिकेट, नेमबाजी, जलतरण, फुटबॉल व मर्दानी क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक संपादन केला आहे. याचे मूळ राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या ध्येय आणि धोरणात रुजलेले आहे.

शाहू महाराजांचे वडील जयसिंगराव तथा आबासाहेब घाटगे यांनाही कुस्तीचा शौक होता. त्यांनी आपल्या यशवंतास तालमीचा छंद लावला होता ते अगदी बालपणापासूनच. त्यामुळे यशवंतरावांनासुद्धा कुस्तीची कमालीची आवड. यशवंतरावांचे छत्रपती शाहू झाले तरी त्यांच्या मल्लविद्याच्या उपासनेत बिलकुल खंड पडला नाही. शिक्षणासाठी राजकुमार शाहू राजकोट आणि धारवाडला रवाना झाले तरी त्यांच्या समवेत दोन मल्ल होतेच. त्यांची मेहनत व कुस्तीव्रत अखंड चालू होते. वस्ताद दत्तोबा शिंदे व पांडू भोसले त्यांच्या मल्लविद्याच्या शिक्षणाची काळजी घेत असत.

ज्यावेळी शाहू महाराजांना मुखत्यारी मिळाली त्यावेळी त्यांनी करवीरला जंगी मैदान भरवले. विजयी मल्लांना तसेच पराभूत मल्लांनाही भरघोस बक्षीसे बहाल केली. मल्लांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. मल्लविद्याला आश्रयदाता मिळाला. मल्लविद्याच्या क्षेत्रात नव्या मनूचा प्रारंभ झाला होता. शाहू महाराजांचा देह मल्लगिरीला शोभेल असाच होता. आपल्यासारखी सामर्थ्यवान आणि धिप्पाड लोक महाराजांना आवडायचे. त्याचमुळे मल्लविद्याप्रमाणेच मल्लांवर सुद्धा त्यांचे भरपूर प्रेम होते. पंजाबवरुन त्यांनी अनेक नामांकित मल्ल करवीर नगरीत आणले. त्यांच्या लढती केल्या. मराठी मल्ल उंचपुऱ्या निफाड पंजाबी मल्लांशी तोलामोलाने लढला पाहिजे यासाठी प्रयत्न केले. आपल्या जनतेतील युवकांना कुस्तीचा छंद लागावा म्हणून पद्धतशीर प्रयत्न केले. कुस्तीत चुणूक दाखवणाऱ्या पठ्ठयांना आश्रय दिला. पारितोषिके देऊन प्रोत्साहन दिले. अनेक मुलांना पदरी बाळगले. थोडक्यात मल्लविद्येचे दक्षिणेतील लालन-पालन आणि संवर्धन करण्याचे काम शाहू महाराजांनी केले. त्यामुळेच मल्लविद्याचा पोशिंदा अशी शाहू महाराजांची भारतभर ख्याती आहे.

**आखाडे आणि तालीम उभारणी:**

पंजाबी पैलवानांबरोबर कोल्हापूरच्या पैलवानांनी मुकाबला करावा आणि कुस्ती क्षेत्रात कोल्हापूरचे नाव गाजवावे या उद्देशाने महाराजांनी शहरातील विविध जुन्या तालमींना भेटी दिल्या. काही तालमींची पडझड झाली होती त्याची डागडुजी केली. बाबूजमाल तालमीचा जिर्णोद्धार केला. त्या ठिकाणी श्रीखंडे नावाचे कुस्तीगार प्रशिक्षक म्हणून नेमले. अशाप्रकारे जवळ जवळ 50 ते 60 तालमीचे महाराजांनी पुनरुज्जीवन केले. नवीन तालमी बांधण्यासाठी महाराजांनी मोफत जागा व अर्थसहाय्य केले. व्यायामाची सर्व साधने पुरवली.

कुस्त्यांप्रमाणे महाराजांनी आखाड्यांमध्ये मर्दानी खेळांनाही प्राधान्य दिले . काही तालमींना फरी गदगा, दांडपट्टा, बोथाटी, विटा, भाला, बाण असे साहित्य पुरवले. अशाप्रकारे महाराजांनी प्रथमतः काही जुन्या तालमींची सुधारणा केली तसेच काही नवीन तालमी निर्माण केल्या. त्यावेळी कोल्हापुरात अशा एकूण शंभरच्या वर तालमी होत्या. प्रत्येक पेठेत नाही म्हणायला सुमारे 15 ते 20 तालमी निर्माण झाल्या. त्यापैकी काही महत्त्वाच्या तालमींची नावे पुढीलप्रमाणे.

मोतीबाग तालीम, पंत अमात्य बावडेकर आखाडा, तटाकडील तालीम, बाराइमाम तालीम, पंचगंगा तालीम, बाजापराव माने तालीम, निरंजन मठ तालीम, गंगावेस तालीम, शाहूपुरी तालीम, सत्यनारायण तालीम, बोडके तालीम, लाल आखाडा, संध्यामठ तालीम, रंकाळावेस तालीम इ.

**लाल आखाडा:**

छत्रपती शाहू महाराजांनी नवीन राजवाड्याच्या मागे बांधलेला हा भव्य लाल आखाडा. त्या काळी शाहूराजांच्या खास आणि मर्जीतल्या मल्लांसाठी हा आखाडा उभारण्यात आलेला होता. या तालमीत सोन्याचांदीच्या वरखापासून ते दुधातुपापर्यंत सर्व खुराक मोफत असायचा. बदामाच्या आणि फळांच्या गोण्या खास पैलवानांना दर आठवड्याला महाराजांच्या खाजगी खर्चातून दिल्या जायच्या. स्वत: छत्रपती शाहू महाराज सराव येथे करत असत. कोल्हापुरातील अनेक तालमींप्रमाणे याही आखाड्यात संस्थानातील व उत्तरेतील मल्लविदयेची उपासना करत असत. येथे एकाच वेळी अनेक मल्ल कुस्तीचा सराव करू शकत असत. तसेच उत्तरेतील आणि कोल्हापूर बाहेरील अनेक मल्ल याच आखाड्यात रहात असत. याच काळात छत्रपती शाहूनी अनेक मल्लांना दत्तक घेतले होते. कुस्त्यांच्या माध्यमातून मल्लांना बक्षीस स्वरुपात मदत करणे आणि युवकांना शरीरयष्टी कमावण्यासाठी प्रोत्साहन देणे हा यामागचा मूळ उद्देश होता.

**श्री शाहू खासबाग कुस्त्यांचे मैदान:**

राजर्षी शाहू महाराज यांनी रोममधील ऑलिम्पिकचे स्टेडियम व ओपन थिएटर पाहिल्यानंतर त्याप्रकारचे कुस्ती मैदान कोल्हापुरात साकारण्याची कल्पना सुचली. शाहू महाराज रोममधून कोल्हापुरात परत आल्यानंतर मिरजकर तिकटी येथील राजघराण्यातील माणसांसाठी खास राखून ठेवलेल्या बागेत अर्थात खासबागेत या मैदानाची संकल्पना व आराखडा ठरविला. त्याप्रमाणे रोम येथील मैदानाची प्रतिकृती खासबागेत उभारण्याचे काम सुरू झाले. १९०७ साली हा कुस्तीचा आखाडा बांधण्यास सुरुवात झाली आणि १९१२ मध्ये आखाडा बांधून पूर्ण झाला. या संपूर्ण मैदानात सुमारे २५ ते ३० हजार लोक बसू शकतात. तसेच मैदानाच्या कोणत्याही कोपऱ्यात बसले तरी प्रत्येकाला कुस्ती दिसते हेच या मैदानाचे वैशिष्ट्य आहे.

या मैदानाच्या उद्घाटनाच्या वेळी जगज्जेता पहिलवान गामा याचा भाऊ इमामबक्ष ऊर्फ धाकटा गामा व गुलाम मोहिद्दीन यांच्यात लढत झाली होती. हे दोन्ही मल्ल अफाट ताकदीचे असल्याने यावेळी जोरदार लढत पाहायला मिळाली होती. यामध्ये इमामबक्षने मोहिद्दीनला अस्मान दाखवले. शाहू महाराजांनी इमामला चांदीची गदा बक्षीस दिली तसेच पराभूत

मल्लांलादेखील बक्षीस दिले. तेव्हापासून चांदीची गदा देणे आणि पराभूत मल्लांचा सन्मान करणे या परंपरेलाही सुरुवात झाली.

आजअखेर खासबाग मैदानावर मारुती माने, सादिक पंजाबी, गोगा, दादू चौगुले, बाळू पाटील, लक्ष्मण वडार, विष्णू जोशीलकर, हरिश्चंद्र बिराजदार, नामदेव मोळे, विजय कुमार, झारखंडेराय इ. भारतीय आणि तसेच पाकिस्तानी मल्लांनी मैदान मारले आहे. या मैदानात महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी यासारख्या अनेक प्रतिष्ठेच्या स्पर्धा पार पडल्या आहेत.

**मोतीबाग तालीम:**

या तालमीची स्थापना छत्रपती बापूसाहेब महाराजांनी 1824 ते 1825 च्या दरम्यान केल्याचे सांगितले जाते. या तालमीत खुद्द राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनीही कुस्तीचे धडे गिरवली आहेत. 1895 मध्ये त्यांनी जुन्या राजवाड्यातील वस्तीर्ण मोतीबागेत तालीमीची डागडुजी केली. पुढे 1900 च्या पुढील काळात राजर्षी शाहू महाराजांचे निकटवर्ती असलेल्या गुरु महाराज यांच्या अधिपत्याखाली तालमीची वाटचाल सुरू राहिली. त्यावेळी अखंड भारत असल्यामुळे लाहोर सह हरियाणा, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश यासारख्या प्रदेशातून सधन आणि गरीब घरातील युवक कोल्हापूर मध्ये कुस्तीचे धडे गिरवण्यासाठी येत होते. विशेषता मोतीबाग तालमीकडे या युवकांचा ओढा अधिक असायचा.

**जुना राजवाड्यातील कुस्त्यांचे मैदान:**

छत्रपती शाहू महाराज कुस्तीतील अनेक खेळाडूंचे प्रेरणास्थान बनले, कारण ते स्वत: सर्वोत्तम कुस्ती खेळायचे. कागलमध्ये असतानाच शाहू महाराजांना कुस्तीच्या आखाड्याचे आकर्षण निर्माण झाले. महाराजांच्या अंगामध्ये शक्ति होती, लवचिकता होती आणि ते वेगवान कुस्ती करण्यात महाराज माहिर होते. राजघराण्यातील लोकांना कुस्ती खेळण्यासाठी बंदी होती, कारण त्या काळी कुस्ती खालच्या जातीतील लोक खेळतात असा समज होता. मैदानात उतरून कुस्ती करणारे शाहू महाराज हे राजघराण्यातील पहिले व्यक्ती होते.

सुरवातीला जुना राजवाड्याच्या प्रांगणात कुस्त्या सुरू करून महाराजांनी लोकांना कुस्तीकडे वळवले. जिंकलेल्या मल्लबरोबरच पराभूत मल्लांस त्यांनी गौरवण्यास सुरवात केली. आपल्या संस्थानातील लोकांनी व्यायामाकडे वळावे आणि तंदुरुस्त बनावे अशी त्यांची इच्छा होती. त्यानंतर महाराजांनी अनेक तालमी स्थापन केल्या. महाराजांनी स्थापन केलेल्या तालमीच्या प्रवेशद्वारावरच महाराजांनी एक फलक लावला होता 'पहिली शरीरसंपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती आणि तिसरी धनसंपत्ती असेल तोच खरा पुण्यवान' या फलकातून शाहू महाराजांच्या मनातील विचार स्पष्ट झाले.

छत्रपती शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय दिला. आपल्या संस्थानातील लोक बलवान आणि निरोगी असावेत अशी त्यांची भावना होती. महाराजांच्या काळात उभारलेल्या आखाड्यांमध्ये सर्व जातीधर्मांच्या मल्लांना प्रवेश होता. देवाप्पा बेरड, शिवाप्पा धनगर, काका पंजाबी, व्यंकाप्पा बुरूड, पांडू भोसले, कमरुद्दीन, गोविंद कसबेकर, कृष्ण बारदाणे असे विविध जाती-धर्मातील नामवंत मल्ल त्यांच्या राजाश्रयामुळे घडले. मल्लांचा व्यायाम, त्यांचा खुराक यावर महाराजांची बारीक नजर असायची. वस्ताद लोकांना ते त्यासाठी विशेष सूचना द्यायचे. महाराज स्वत: पहाटे लवकर उठून मल्लांना घेऊन हौदयात उतरत आणि त्यांना डावपेच शिकवत. आपल्या आश्रित मल्ल आणि त्यांच्या खुराकावर ते महिन्याला खाजगी तिजोरीतून ३०,००० रु. खर्च करत असत.

त्याकाळी केवळ मंगळवारी कुस्त्यांचे मैदान भरत होते. शाहू महाराजांनी मंगळवार आणि शुक्रवारी जुन्या राजवाड्याच्या प्रांगणात कुस्त्या सुरू केल्या. महाराज स्वत: या कुस्त्या बघण्यासाठी हजर असत. त्यामुळे दरबारातील सरदार, व्यापारी, लोक आणि परगावातील पाहुणे या कुस्त्या बघण्यासाठी हजर राहू लागले. यामुळे कुस्तीला महत्व आले आणि कुस्ती राजाश्रयाबरोबच लोकाश्रयाकडे झुकली.

**नामवंत मल्ल तयार करण्याचा मनोनिश्चय आणि त्यासाठी तयार केलेली दहा कलमी योजना:**

शाहू महाराजांनी १८९७ मध्ये युवराज राजाराम महाराजांच्या जन्मप्रित्यर्थ करवीरमध्ये कुस्त्यांचे मोठे मैदान भरवले. या मैदानात उत्तरेकडील मल्ल कल्लू गामा आणि इतर पैलवानांनी करवीरच्या पैलवानांना सहज आस्मान दाखवले. यामुळे महाराज निराश झाले. आपल्या संस्थानातील एकही मल्ल उत्तरेतील मल्लांचा सामना करू शकत नाहीत याचे त्यांना दु:ख वाटले. पण निराश न होता त्यांनी संस्थानातील मल्लांना तयार करण्याचा मनोनिश्चय केला. उत्तरेतील मल्लांना शिकस्त देण्याच्या हेतूने महाराजांनी दहा कलमी योजना तयार केली.

1. स्वत: मल्ल तयार करणे
2. वस्तादांकरवी कसदार मल्ल घडवणे
3. मल्लांच्या खुराकाची व्यवस्था करणे

**4.** व्यायामावर देखरेख
**5.** मल्लांसाठी वैद्यकीय सुविधा
**6.** मल्लांना राजाश्रय देणे
**7.** सरावासाठी उत्तरेकडील मल्लांना करवीरमध्ये आणणे
**8.** मोठी बक्षिसे देऊन मल्लांचा सन्मान करणे
**9.** वस्तादांच्या उदरनिर्वाहाची सोय
**10.** मल्लांची राहण्यासह खुराकाची सोय

देवाप्पा धनगर, मुन्ना, शिवाप्पा बेरड, पांडू भोसले, कृष्णा मर्दाने, दादू हेरले, शामू रायबागे, बिरंजा पाटील, रामा पैलवान, हुसेन मांगलेकर, पांडू शिराळकर, दादू करनाळे अशा अनेक मल्लांना ते स्वत: आखाड्यात उतरून शिकवत. पुढे याच मल्लांनी उत्तरेतील आणि पंजाबातील मल्लांना आस्मान दाखवून महाराजांचा निश्चय पूर्ण केला. पंजाबचा कीर्तीशाली मल्ल हमदुकाका याला शिवाप्पा बेरड याने पन्हाळ्याच्या मैदानात आस्मान दाखवले. भोला पंजाबिला कृष्णा मर्दाने याने १३ मिनिटात आस्मान दाखवले. अगरतलाचा नावाजलेला मल्ल नवरंग सिंग याला गणपती शिंदे याने चारीमुंड्या चित केले. यामुळे उत्तरेकडील पैलवानांची घमेंड जिरली. या आणि पुढे जाऊन अशा अनेक मल्लांनी महाराजांचे नाव मोठे केले. पुढे खाशाबा जाधव यांनी ऑलंपिक स्पर्धेत पदक मिळवले. याची बीजे महाराजांनी सुरू केलेल्या कुस्ती चळवळीत होती. कालांतराने ही कुस्ती चळवळ फक्त करवीर संस्थानपुरती मर्यादित न राहाता देशभर पसरली.

**शाहूकालीन नामांकित मल्ल:**

**कल्लू गामा (लाल आखाडा):** छत्रपती शाहू महाराजांचा राजाश्रय मिळालेला उत्तरेकडील कीर्तीवान मल्ल. १८९७ साली युवराज राजाराम महाराजांच्या जन्मदिनी झालेल्या जंगी मैदानात कल्लूने मराठी मल्लांना चिटपट केल्यामुळे महाराज निराश झाले आणि पंजाबी मल्लांना आसमान दाखवणारे मल्ल तयार करण्याचा मनोनिग्रह महाराजांनी केला.

**महम्मद गामा (लाल आखाडा):** महम्मद गामा जगज्जेता पहिलवान होता. या आंतरराष्ट्रीय मल्लांला महाराजांनी राजाश्रय दिला. नवीन राजवाड्यातील लाल आखाड्यामध्ये गामा मेहनत करत होता.

**इमामबक्ष:** हा गामाचा भाऊ. मध्यप्रदेशातील दतीया संस्थांमध्ये होता. महाराजांचा कुस्तीतील लौकिक ऐकून महाराजांच्या राजाश्रयाला आला. १९११ साली दिल्ली दरबार मैदानात शाहू महाराजांच्या हस्ते हसनबक्ष या नामवंत मल्लांबरोबर कुस्ती लावण्यात आली. या कुस्तीत इमामबक्ष विजयी झाला. यावेळी छत्रपतींनी स्वताच्या डोक्याचा फेटा घालून त्याचा गौरव केला.

**गुलाम मोहिद्दीन (लाल आखाडा):** बापूसाहेब महाराजांच्या आखाड्यातील उत्तरेकडील एक नामवंत पंजाबी मल्ल. खंदा लढवय्या अशी ओळख. शाहू महाराज स्वत: त्याच्याशी कुस्तीचा सराव करत तसेच डावपेचांचे शिक्षण देत. खासबाग मैदानाच्या उद्घाटन प्रसंगी गुलाम मोहिद्दीनची कुस्ती इमामबक्ष याच्याशी झाली.

**गुत्तासिंग (सोनतळी तालीम)**: ख्यातनाम पंजाबी मल्ल छत्रपती शाहू महाराजांच्या राजाश्रयास होता. सोनतळी येथे असणाऱ्या तालमीमध्ये तो आश्रयास होता. छत्रपतींनी स्वत: करामती हा डाव या मल्लास शिकवला होता. १९११ साली दिल्ली येथे झालेल्या दरबार मैदानात नथ्था पैलवानाशी मानाची कुस्ती छत्रपतींच्या हस्ते लावण्यात आली.

**व्यंकाप्पा बुरूड:** व्यंकाप्पा बुरूड उर्फ काळा मारुती. छत्रपतींच्या तालमीतील अजिंक्य मल्ल. उत्तरेकडील अनेक मल्लांशी कुस्ती करून त्यांना चितपट करण्यात माहीर.

**देवाप्पा धनगर:** छत्रपती शाहू महाराजांचा आवडता बुरूजबंद आणि दमदार मल्ल. या मल्लाला रुस्तूम-ए-हिंद करण्याची छत्रपतींची जिद्द होती. पण देवाप्पाच्या अकाली मृत्यूमुळे ही इच्छा अपूर्ण राहिली. देवाप्पाच्या मृत्यूमुळे महाराजांना अतिशय दु:ख झाले.

**गणपती शिंदे (सोनतळी तालीम):** महाराजांचा आवडता मल्ल. नवरंग सिंग, बस्सा, बडा प्रताप इ. अनेक नामवंत पंजाबी मल्लांवर नेत्रदीपक विजय मिळवल्याबद्दल महाराजांकडून सोन्याचे कडे आणि उसाचा मळा बक्षीस.

**गोपाळ परीट:** अत्यंत चपळ मल्ल. चमकदार कुस्त्या करण्यात पटाईत. महाराजांकडून हत्तीवरून मिरवणूक काढून गौरव.

**गुलाम कादर (बाबूजमाल तालीम):** उत्तरेकडील नामवंत पंजाबी मल्ल.

**बिंदू ब्राम्हण (बाबूजमाल तालीम):** उत्तरेकडील नामवंत पंजाबी मल्ल.

**समारोप:**

कोल्हापूरच्या मल्लांनी आपल्या कुस्ती कौशल्याद्वारे संपूर्ण हिंदुस्थानात वर्चस्व गाजवावे ही राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची मनोकामना खऱ्या अर्थाने सन 1959 मध्ये पूर्ण झाली. कोल्हापूरच्या शाहू तालमीचे मल्ल श्रीपती खंचनाळे यांनी 1959 मध्ये दिल्ली येथे आयोजित हिंदकेसरी स्पर्धेत पंजाबचा प्रसिद्ध पैलवान बंतासिंग याला चारीमुंड्या चित करत हिंदकेसरी पदाची पहिली गदा महाराष्ट्राला मिळवून दिली. पुढे गणपतराव आंदळकर, मारुती माने, चंबा मुत्नाळ, हजरत पटेल, दीनानाथ सिंह, विनोद चौगुले आणि योगेश दोडके यांनी हिंदकेसरीची मानाची गदा खेचून आणली. अनेक पैलवानांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कोल्हापूरचे नाव कुस्तीमध्ये उज्वल केले.

म्हणजेच शाहूराजांनी जी दहा कलमी योजना केली होती ती फक्त तेवढ्या काळापूर्ती मर्यादित नसून ती त्यांच्या रयतेच्या तिथून पुढच्या येणाऱ्या सर्व पिढ्यांसाठी होती याची प्रचिती येते. यातूनच कुस्तीच्या विकासासाठी कुस्ती क्षेत्रात नवीन स्थित्यंतर घडवून आणण्याचे अनेक नवे पायंडे करवीर नगरीत पडले. येथील कुस्तीचा राजाश्रय ही कायम आहे आणि कायमचा लोकाश्रय मिळाला आहे. कोल्हापूर बरोबरच बाहेर राज्यातून, इतर जिल्ह्यातून किंवा भागातून येणारी मुले येथे आखाड्यात उतरताना आणि कुस्तीचे डावपेच शिकताना दिसतात. शरीर संपदा कमवतात आणि मैदानात उतरतात. हे मल्ल कालांतराने जरी कोल्हापुरातून बाहेर पडले तरी त्यांच्या अंगाला चिकटलेल्या मातीबरोबरच शाहूनगरीचे नाव मात्र त्यांच्याबरोबर कायम रहाते.

**संदर्भ:**

https://m.facebook.com/BurudSamaj/photos/a.991583890908996/3604170062983686/

https://www.lokmat.com/kolhapur/gurukul-moral-vidya-motibagh-training/

https://www.youtube.com/watch?v=BJO03Y6hRd0

खराडे सुनील (2022), 'राजर्षि छत्रपती शाहू महाराजांचे शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रातील योगदान - एक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डॉ. रमेश जाधव (2002), ''लोकराजा शाहू छत्रपती'', शैलेन्द्र प्रकाशन - दुसरी आवृत्ती.

नाईक तु. बा., (2005), राजर्षि छत्रपती शाहू महाराज, मेहता पब्लीकेशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती.

पवार जयसिंगराव (2001), राजर्षि शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती.